नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 07/10/2020 (बुधवार)
(सायंकाळ)

---

## गॅस कटरने ATM मशीन कापून पैसे चोरी करणारी आंतरराज्यीय टोळीला स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे पथकाने केले जेरबंद....

दि. 03/10/2020 रोजी पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत येणारे मनसर येथील बॅक ऑफ इंडीयाचे एटीएम मशिन गॅस कटरने कापून त्यामधील 19,90,500/- रुपये रोख रक्कम चोरी गेल्याने पो.स्टे. रामटेक येथे अप.क्र. 567/2020 अन्वये गुन्हा नोंद असून सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नाग्रा यांना समांतर तपास करण्याचे निर्देश दिल्याने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांनी 4 विशेष तपास पथके तयार करुन तपासाची सुत्रे हलविली त्यातच प्राप्त माहितीच्या अनुषंगाने दि. 04/10/2020 रोजी सदर गुन्हयात ट्रक क्रमांक RJ14GK-6949 चा वापर केल्याचे माहित झाले यावरुन सदर ट्रक कोणत्या मार्गाने गेलेला आहे याची माहिती घेतली असता सदरचा ट्रक राष्ट्रीय महामार्ग क्र. 7 ने हैद्राबाद मार्गाने चेन्नई येथे निघून गेल्याची माहिती प्राप्त झाली. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने सदर ट्रकचा पाठपुरावा करुन चेन्नई येथे शोध घेतला असता ट्रक चेन्नई येथील फॉरेज इंडीया प्रायव्हेट लिमीटेड या रबर कंपनीत गेल्याची माहिती हाती लागली त्यावरुन चेन्नई येथील स्थानिक पोलीस ठाणे दुसी पोलीसांची मदत घेतली असता त्यांचेसह फॉरेज इंडीया प्राय.लिमी. कंपणीत जावून वरील ट्रक ताब्यात घेतला. ट्रक चालक-मालक आरोपी क्र. 1) साजिद वल्द रशिद खान, वय 28 वर्षे रा. पचगांव तह ताऊरु जिल्हा नुह (मेवात) हरियाणा व त्याचेसोबत ट्रकमध्ये असलेले त्याचे तिन साथीदार 2) अहमद्दीन उस्मान वय 22 वर्ष रा. नल्लड तह. जि. नुह, 3) तौफीक मंमरेजखान वय 27 वर्षे ट्रक चालक रा. खातीवास तह. तिजारा जि. अल्वर (राजस्थान) आणि 4) जैनुलआबदीन उर्फ दुर्रु वल्द अयुब खान वय 22 वर्ष रा. शिकारपुर तह ताऊरु जिल्हा नुह यांचेवर संशय बळावल्याने त्यांना ताब्यात घेवून उपरोक्त ट्रकसह आरोपींना नागपूर येथे सुस्थीतीत आणले. विचारपुस दरम्यान वरील आरोपींनी गुन्हा केल्याचे सांगीतले व सदर गुन्हयात त्यांचेव्यतिरीक्त त्यांचे आणखी दोन साथीदार 1) काला व 2) ताजीर उर्फ पहेलवान हे असल्याचे सांगीतले. त्यांचे दोन्ही साथीदार हे नेल्लोर येथे पळून गेल्याची माहिती समोर आली. तसेच पो.स्टे. देवलापार अप.क्र. 200/2020 मधील गुन्हयातील एटीएम फोडण्याचा प्रयत्न व यापुर्वी जुलै 2020 मध्ये पो.स्टे. सावनेर अप.क्र 339/2020 गुन्हयातील धापेवाडा रोड वरील एटीएम फोडल्याचे सांगतात. त्याचबरोबर तेलंगाना येथील नालगुंडा येथे SBI बॅकेच एटीएम गॅस कटरने तोडल्याचे सांगीतले आहे.

आज दि. 07/10/2020 रोजी आरोपी साजिद वल्द रशिद खान आणि त्यांचे इतर तिन साथीदार यांचे जवळील ट्रक क्रमांक RJ14GK6949 ची कायदेशिररित्या झडती घेतली असता ट्रकचे कॅबीनमधील एका छुप्या कप्प्यात एक काळया रंगाची बॅग मिळून आली. त्या बॅगची पाहणी केली असता, त्यामध्ये नगदी 9,50,000/- रुपये मिळून आले. मिळून आलेल्या रक्कमेबाबत आरोपी साजिद याने सांगीतले की, त्याचे साथीदार काला, ताजीर, तौफीक, दुर्रु आणि अहमद्दीन यांनी दि. 03/10/2020 रोजी पहाटे 4.00 वाजताचे सुमारास मनसर येथील बॅक ऑफ इंडीयाचे एटीएम मशिन गॅस कटरने कापून सदरचे पैसे चोरी करुन मिळविले असल्याचे सांगीतले. यानंतर ट्रकची संपुर्ण झडती घेतली असता कॅबीनवरील वरच्या बाजूला एक गॅस सिलेन्डर, एक ऑक्सीजन सिलेन्डर आणि गॅस कटर असे साहीत्य मिळून आले. तसेच ट्रकमध्ये दोन मोबाईल फोन मिळून आले. यावरुन आरोपीतांचे ताब्यातुन गुन्हयात वापरलेल्या ट्रक सह एकुण 49,76,900/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह) श्री संजय पुरंदरे यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे आदेशाने विशेष पथकातील सहा. पोलीस निरीक्षक जितेन्द्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक सचिन मत्ते, नरेंद्र गौरखेडे, जावेद शेख व स्थानिक गुन्हे शाखेचे कर्मचारी सहा.फौज. लक्ष्मीप्रसाद दुबे, पोलीस हवालदार नाना राऊत, महेश जाधव, गजेन्द्र चौधरी, सुरज परमार, निलेश बर्वे, राजेन्द्र सनोडीया, रमेश भोयर, मदन आसतकर, चंद्रशेखर घडेकर, विनोद काळे, पोलीस नायक दिनेश आधापूरे, रामराव आडे, सुरेश गाते, अरविंद भगत, शैलेष यादव, पोलीस शिपाई अमोल वाघ, विपीन गायधने, रोहन डाखोरे, बालाजी साखरे, महेश बिसने, प्रणय बनाफर, विरेन्द्र नरड, महिला कॉन्स्टेबल नम्रता बघेल आणि चालक सहा फौज. साहेबराव बहाळे, पोलीस हवालदार भाऊराव खंडाते, पोलीस नायक अमोल कुथे तसेच सायबर सेलचे पोलीस निरीक्षक कदम, पोलीश शिपाई सतिष राठोड तसेच पोलीस स्टेशन रामटेक येथील पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत हत्तीमारे, पोलीस हवालदार रामेश्वर रावते, पोलीस नायक गजानन उकेबोंद्र, पोलीस शिपाई तुषार कुडुपल्ले यांचे पथकाने पार पाडली.



## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावर बालाजी नगर उमरेड येथे दिनांक 04/10/2030 चे 21.30 वा. दरम्यान कु. लक्ष्मी मुरलीधर बरडे, वय 25 वर्ष, रा. बालाजी नगर उमरेड हिला मागील दोन वर्षा पासुन लग्नाकरीता पाहुणे पाहायला येत होते, परंतु तिला पसंत करीत नव्हते. त्यामुळे तिने तिचे राहते घरी कोणतेतरी विषारी औषध प्राशन केले. तिची प्रकृती खराब झाल्याने तिला उपचाराकामी मेडीकल कॉलेज, नागपुर येथे नेले असता दि. 05/10/2020 चे 02.05 वा. तिचा मृत्यु झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शंकर गणपतराव बल्की, वय 45 वर्ष, रा. भुनेश्वर नगर प्लॉट नं.119, गंगाबाई घाटरोड नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक मनोज वाघ 9420756751 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर